नि.दि. दावा क्र. २१/२०१०
CNR No. MHAK070001512010

**<u>निशाणी १०० व १०१ वर संयुक्त आदेश</u>**

१. वादी यांनी नि.क्र. १०० नुसार प्रतिवादी सुभाष रामचंद्र मसने यांचे अतिरीक्त वारस अभिलेखावर घेण्यासाठी दि. ०८.०२.२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. परंतु प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर त्यांनी नि.क्र.१०१ नुसार विलंब माफीचा अर्ज दि. ०७.०६.२०२३ दाखल केलेला आहे. त्यामुळे दोन्ही अर्जवर संयुक्तपणे आदेश पारीत करणे आवश्यक आहे.

२. अर्ज नि.क्र.१०१ मध्ये असे नमुद केले आहे की, सदर प्रकरणातील प्रतिवादी दि. २२.०३.२०२१ रोजी मयत झालेले असुन त्यांनी प्रतिवादीचे उत्तराधिकारी अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज नि.क्र.९२ दि. ०७.०७.२०२१ रोजी अर्ज सादर करुन उत्तराधिकारी अभिलेखावर घेतले होते. परंतु त्यावेळी प्रतिवादीच्या उर्वरीत उत्तराधिकारी यांच्या विषयी माहिती नसल्यामुळे त्यांना अभिलेखावर घेता आले नाही. त्यामुळे अर्ज नि.क्र. १०० नुसार दि. ०८.०२.२०२३ रोजी त्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्ज नि.क्र. १०० मध्ये असे नमुद केलेले आहे की, दि. २२.०३.२०२१ रोजी प्रतिवादी मयत झालेले असुन दि. ०७.०७.२०२१ रोजी वादीने प्रतिवादी चे उत्तराधिकारी अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज केलेला होता. प्रस्तुत अर्ज न्यायालयाने मंजुर केलेला असुन त्यानुसार प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यात आलेले आहे. परंतु वादीला प्रतिवादीच्या सर्व वारसांविषयी माहिती नसल्यामुळे मयत प्रतिवादी सुभाष रामचंद्र मसने यांचे सर्व वारस अभिलेखावर घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत अर्जानुसार १.शालीनी सुभाष मसने, २.दर्शना ज्ञानेश्वर हाडोळे, ३. हर्षा अमोल शेगोकार इत्यादी वारस अतिरीक्त वारस अभिलेखावर घेण्याची विनंती वादीने केलेली आहे.

४. प्रतिवादींनी नि.क्र.१०० व १०१ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रखर विरोध केलेला आहे. त्यांनी पुढे असे कथन केलेले आहे की, अतिरीक्त वारस घेण्यासाठी

कोणतीही कायदयामध्ये नसल्यामुळे प्रस्तुत अर्ज रक्कम रु. १०००/– खर्चा सह खारीज करण्यात अशी विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे तसेच अभिलेख पाहिला. अभिलेखावरुन असे दिसुन येत आहे की, दि. ०७.०७.२०२१ रोजी नि.क्र.९२ नुसार वादीने प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज केला होता आणि त्यानुसार दि . २२.०९.२०२१ रोजी सदर न्यायालयाने आदेश पारीत केलेला आहे. परंतु त्यानंतर पुन्हा दि. ०८.०२.२०२३ रोजी उर्वररीत वारस अभिलेखावर घेण्यासाठी वादीने पुन्हा नव्याने अर्ज करुन त्यामध्ये असे कथन केले आहे की, त्यांना प्रतिवादीच्या सर्व वारसांविषयी माहिती नसल्यामुळे काही वारस अभिलेखावर घेता आलेले नाहीत. अतिरीक्त हे मयत प्रतिवादी यांच्या मुली असल्याचे दिसुन येत आहे आणि नि.क्र. ९२ नुसार केवळ प्रतिवादीच्या मुलांना अभिलेखावर घेण्यात आल्याचे दिसुन येत आहे.

५. मुदतीचा कायदा परीशिष्ठातील आर्टीकल क्र. १२० प्रमाणे वादी किंवा प्रतिवादीचा मृत्यु झाल्यापासुन ९० दिवसाच्या आत त्याचे उत्तराधिकारी अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. परंतु अर्ज नि.क्र. १०१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १ वर्ष, ११ महिने,१५ दिवस इतका विलंब झालेला आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, झालेला विलंब हा उद्धेश पुर्वक नाही. याठिकाणी हे विचारात घेणे आवश्यक आहे की, सदर दावा अभिलेखावरुन काढुन टाकण्यात आल्यानंतर नि.क्र.९१ नुसार अबेटन्मेंट चा झालेला आदेश रद्द करण्यासाठी अर्ज सादर करुन त्यानंतर नि .क्र.९२ नुसार उत्तराधिकारी अभिलेखावर घेण्यासाठीचा अर्ज न्यायालयाने दि. २२.०९.२०२१ रोजी मंजुर केलेला होता. वारसामधील नातेसंबंध विचारात घेता त्यांच्या विषयी माहिती नसण्याचे कोणतेही कारण नाही, त्यामुळे इतर वारसांविषयी माहिती नव्हती हे कारण संयुक्तीक दिसुन येत नाही.

६. परंतु असे जरी असले तरी प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी प्रतिवादीच्या उर्वरीत उत्तराधिका–यांना दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**: आ दे श :**

१. अर्ज नि.क्र. १०१ मंजुर करण्यात येवुन उत्तराधिकरी अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

२. अर्ज नि.क्र. १०१ रक्कम रु.५००/–च्या दावा खर्चास अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

३. अर्जदाराने आवश्यक ती पुर्तता दि. १७.०७.२०२३ रोजी अथवा त्यापुर्वी करावी.

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2023.07.05 18:00:53 +0530

( विष्णु द. गिते)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.

दिनांक : ०५/०७/२०२३.
ठिकाणः बाळापूर

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Date of Decision | :- | 05/07/2023 |
| Order signed by P.O on | :- | 05/07/2023 |
| Order uploaded on | :- | 05/07/2023 |